# सिपना अभियांत्रिकीचा दिक्षांत समारोह संपन्न

सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ चा एकरुप परिनियम क्र. ०४/२०१८ अन्वये पदवी वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. डॉ. संदीप मेश्राम, Corporate relations officer, collage of Engineering Pune, यांना प्रमुख अतिथी म्हणुन आमंत्रित करण्यात आले होते. तसेच सिपना शिक्षण प्रसारक मंडळ अमरावतीचे अध्यक्ष मा. श्री. जगदीशभाऊ गुप्ता यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष पद भुषविले.

कार्यक्रमाची सुरवात सरस्वती पुजनाने करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ. संदीप मेश्राम सरांचा रोपटे व स्मृतीचिन्ह देवुन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक Degree Program Co-ordinator डॉ. अजय ठाकरे यांनी केले. सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या दोन दशकांच्या प्रवासात आलेले चढउतार व त्यातुन झालेली महाविद्यालयाची प्रगती या संदर्भात डॉ. अजय ठाकरे सरांनी विस्तृत माहिती दिली. कार्यकारी प्राचार्य डॉ. अविनाश गावंडे यांनी महाविद्यालयीन स्तरावर पदवी वितरण समारंभ आयोजित करण्यासंदर्भात शासनाच्या भुमिकेवर आपले मत विषद केले.

प्रमुख अतिथी डॉ. संदीप मेश्राम सरांनी विद्यार्थ्यांची महाविद्यालयाबाबत असलेली आपली आस्था कायम ठेवुन उत्तरोत्तर प्रगती साधावी असे मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष मा. जगदीशभाऊ गुप्ता यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या पदवीचा व ज्ञानाचा उपयोग आपला समाज व देशाची प्रगती साधण्यासाठी कसा करता येईल यावर आपले मत व्यक्त केले. सदर प्रसंगी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना आपल्या महाविद्यालयीन काळाचा अनुभव व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संगणकशास्त्र विभागाचा विद्यार्थी श्री. अभिषेक शाह यांनी केले तसेच आभारप्रदर्शन प्रा. आनंद देशमुख सरांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता डॉ. प्रफुल गावंडे, प्रा. केतकी इंगोले, प्रा. उज्वल घाटे, प्रा. अमर साबळे, प्रा. एस. बी. राठोड, प्रा.मंदार तारे, प्रा.प्रेम जाखोटीया, प्रा.जयकुमार कर्णेवार ईत्यादिंनी अथक परिश्रम घेतले.




Sipna College of Engineering & Technology, Amravati
DEGREE PROGRAM
CONVOCATION
On


Sipna College of Engineering & Technology, Amravati
DEGREE PROGRAM
CONVOCATION
On
25th January 2019